**दिनांक १८/०२/२०२६**

**प्रेस नोट**

**पोलीस उपायुक्त, परिमंडळ ०४, मुंबई**

**रात्रीच्या वेळी सार्वजनिक ठिकाणी मोबाईल चोरी करणा-या सराईत आरोपीताचा शिताफीने शोध घेऊन ०९ मोबाईल फोन हस्तगत करुन आरोपीतास भोईवाडा पोलीस ठाणेकडून अटक**.

भोईवाडा पोलीस ठाणे गुन्हा. रजि. क्र. ०९/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.स. मधील फिर्यादी हे के. ई.एम. हॉस्पिटल, परेल, मुंबई येथे डॉक्टर असुन, दि.०४/०१/२०२६ रोजी ००:३० वा. ते ०७:०० वा चे दरम्यान त्यांचा सॅमसंग कंपनीचा ए ५४ अ.कि. १०,०००/- हा मोबाईल फोन अज्ञात इसमाने चोरी केल्यामुळे त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून रितसर गुन्हा नोंद केला.

दाखल गुन्हयाचे तपासादरम्यान परीसरातील साधारण ४० ते ५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासुन व तांत्रिक विश्लेषण करूण आरोपीची ओळख पटवुन तो मोबाईल चोरी करणारा अभिलेखावरील सराईत आरोपी नामे फिरोज इस्माईल शेख, वय ४० वर्षे हा असुन तो मध्यरात्री मोबाईल चोरी करायला येत असल्याची माहीती मिळाली. सदर माहितीच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी व अंमलदार यांनी हॉस्पिटल परीसरात सतत ०८ ते १० दिवस सापळा लावला असता दिनांक १६/०२/२०२६ रोजी रात्री ०१:०० वाजताचे सुमारास आरोपी मोबाईल चोरी करण्याच्या उददेशाने आला असता त्यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे चोरी केलेले ०२ मोबाईल फोन मिळुण आले. आरोपीताचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करूण तपासादरम्यान आरोपीताकडुन अन्य ०७ असे एकुण ०९ मोबाईल फोन अ. कि. १,००,०००/- (एक लाख) रूपयेचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला.

अशा प्रकारे सराईत व अभिलेखावरील आरोपीताचा शिताफिने शोध घेवुन त्याचेकडुन चोरी केलेले एकुण ०९ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, मा. सह पोलीस आयुक्त (का. व सु.), मा. अप्पर पोलीस आयुक्त (मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई), पोलीस उप आयुक्त, (परि. ४, मुंबई), सहाय्यक पोलीस आयुक्त (भोईवाडा विभाग, मुंबई), व.पो.नि. दत्तात्रय ठाकुर (भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई) पो. नि. नितीन महाडीक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

सदर मोहिम गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि. सचिन बोरसे, पोउनि. अनिल भोंग , पो.ह. नथ्थुराम चव्हण, पो. ह. नितीन धंगेकर, पो. ह. महादेव माळी, पो.ह. संतोष खेडेकर, पो.शि. जयदिप पाटील, पो. शि. प्रदीप राठोड, पो.शि. अविनाश सुतार, पो.शि. पंकज रोकडे, पो. शि. हेमंत सुळे, पो.शि. शंकर जोशी यांनी पार पाडली.